# Distribution of Masks in the Neighborhood Community





# आबासाहेब काकडे महाविद्यालयाने घेतले १०० कुटुंब दत्तक

## महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा स्तुत्य उपक्रम

**बोधेगाव । वीरभूमी –**

बोधेगाव येथील आबासाहेब काकडे कला महाविद्यालयाने परीसरातील १०० कुटुंब दत्तक घेतली आसल्याची माहीती प्राचार्य डॉ. एम. के. फसले व रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पालवे यांनी दिली.

महाराष्ट्र शासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्याशी वेळोवेळी झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून व त्याच्या मार्गदर्शक तत्वानुसार आपल्या महाविद्यालयातील एन एस एस विभागाने कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर १० विद्यार्थांचा एक आपत्ती व्यवस्थापन गट स्थापन केला आहे यामध्ये बोधेगाव बालमटाकळी, सुकळी, लाडजळगाव, खामपिंपरी, गोळेगांव, शेकटे सह दहा गावातील श्रीकृष्ण निकम, रामेश्वर बिनवडे, वृषीकेश दसपुते, गणेश बर्डे, महेश देशमुख, विठ्ठल बामदळे, शुभम बागडे, विश्वजित देशमुख, राहुल काटे, संतोष घुले या १० विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रति १० कुटुंबाना दत्तक घेतले असुन त्यांच्या आडचणी



[पत्रकार- उद्धव देशमुख]

सोडवणे, त्यांना दवाखाण्याची मदत मिळवून देणे आदी प्रकारचे कामे केली जाणार आहेत. महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कु. ज्योती नागरगोजे (सोनविहीर) व कु. ऋतुजा घोरतळे (एकबुरजे वस्ती, बोधेगाव) यांनी ५०० मास्क तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. तर ३३ विद्यार्थी रक्तदान करण्यासाठी इच्छूक असून विद्यापीठाने तयार केलेल्या वेब पोर्टलवर २० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. युनिसेफ ने आयोजित केलेल्या ऑनलाईन यू-ट्यूब वर १० विद्यार्थ्यांनी ट्रेनिंगही घेतले आहे. पुढील आदेशाप्रमाणे देशावरील संकटाचा सामना करण्यासाठी टीम सज्ज केली असुन परीसरातील कुटुंबाची बारकाईने विचारपुस करुन माहिति संकलीत केली जात असल्याची माहीती प्रा. संदीप पालवे यांनी दिली.

> राष्ट्रीय सेवा योजनेतील दहा विद्यार्थ्यांच्या वतीने सुरुवातीच्या काळात १०० कुटुंबाची देखभाल व त्यांना घर सोडुन लागत असलेल्या सेवेसाठी प्रयत्न केले जाणार असुन या दहा गावात प्रथम स्वरुप ५०० मास्कचे वाटप करण्यात येणार आहे. तद्नंतर गरजेनुसार मदतीचा प्रयत्न केला जाणार आहे.
>
> – **डॉ. एम. के. फसले**, प्राचार्य, काकडे महाविद्यालय, बोधेगाव

**Drinking Water (पाणपोई) Facility for Birds**



